Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# 1857 नंतर ब्रिटिश सरकारचे भारतीय संस्थान विषयक धोरण : एक अभ्यास



प्रा. डॉ. संतोष शंकरराव इंगोले

श्री. तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान

महाविद्यालय वाशीम.

## ABSTRACT

इ.स.1857 च्या राष्ट्रीय उठावाच्यानंतर ब्रिटिशाच्या भारतविषयक धोरणामध्ये महत्वाचा बदल घडून आला. इ.स.1858 मध्ये ब्रिटिश सरकारने भारताचे शासन कंपनीच्या अधिकारामधुन आपल्या अधिकारामध्ये घेतले. तेव्हापासुन संस्थानविषयी धोरणामध्ये मोठा बदल घडून आला. त्यापूर्वी हे संबंध सुनिर्धारीत नव्हते. कारण वेगवेगळया संस्थानाशी विभिन्न परिस्थितीमध्ये वेगवेगळे करार करण्यात आलेले होते. ब्रिटिशांच्या सतत वाढत जाणाऱ्या साम्राज्याचे संस्थानविषयक धोरण विविध परिस्थितीच्या प्रभावावर निर्माण झालेले होते. कधी कधी गव्हर्नर जनरलच्या व्यक्तीगत तत्त्वावर धोरण आधारलेले होते. उदा. वेलस्ली, लॉर्ड हेस्टींग्ज, लॉर्ड डलहौसी यांनी संस्थान विलीनीकरणावर अधिक भर दिला. त्यामुळे संस्थानाची स्थिती 'बळी तो कान पिळी' याप्रमाणे झाली होती.

ब्रिटिशांच्या संस्थानविषयक धोरणाचे स्पष्ट रूप विलीयम ली वार्नर यांच्या 'भारताची देशी संस्थाने' या पुस्तकामध्ये दिसून येते. त्यामध्ये त्यांनी संस्थानविषयक धोरणाचे तीन कालखंड सांगितले. "इ.स.1751 ते इ.स.1813 पर्यंत 'संरक्षणात्मक कुंपनाचे धोरण', 'इ.स.1813 ते इ.स.1857 पर्यंत 'मांडलीक राज्याची परस्परांपासून विलगना' आणि 'इ.स.1858 ते इ.स.1919 पर्यंत 'मांडलिक राज्याची एकता' या धोरणाचा पुरस्कार केला."[1] संस्थानाकडून अधिकाधिक लाभ मिळविण्याचे धोरण कंपनीच्या काळामध्ये राबविण्यात आले. त्याविषयी इ.स.1841 मध्ये कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनी "जास्तीत जास्त प्रदेश प्राप्तीसाठी व महसुल प्राप्तीसाठी कोणतीही संधी न गमाविणे."[2] हे कंपनीचे उद्दिष्ट होते. त्याकरीता लॉर्ड डलहौसीने या उदिष्टाची उच्च पातळी गाठली. परंतु 1857 मध्ये झालेल्या उठावानंतर ब्रिटिशांना या धोरणात बदल करावा लागला.

## KEYWORDS

1857, राष्ट्रीय उठाव , विलीयम ली वार्नर , भारतीय संस्थान , 'फोडा आणि राज्य करा'

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief EIJMR, All Rights Reserved.